# प्रेसनोट

जा.क्र. ३५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२६/०६/२०१६.

## " Drafting of FIR " विषयावर कार्यशाळा

**भंडारा** :— येथील पोलीस मुख्यालयाच्या मिटींग हॉलमध्ये आज दि. २६/०६/०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक मा. विनीता साहू यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अॅड. रविंद्र निकम, सरकारी अभियोक्ता, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांनी भंडारा जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांची "**Drafting of FIR**" या विषयावर कार्यशाळा घेतली.

कार्यशाळेला त्यांनी पोलीस नियमावली भाग ३ मधील नियमांची माहिती दिली. तसेच भारतीय दंड संहीता, भारतीय दंड प्रक्रिया संहीता, भारतीय पुरावा कायदा, बालकाचे लैंगीक अत्याचारापासुन संरक्षण कायदा यातील पोलीसांना उपयुक्त अश्या विविध कलमांबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्रथम खबर, पंचनामा, साक्षदारांचे जवाब कसे नोंदवावे, रिमांड रिपोर्ट, तज्ञ अभिप्राय, महीलांवरील होणा—या लैंगिक छळ, विनयभंग, क्रुर वागणुक, हुंडाबळी इत्यादी अत्याचारांच्या गुन्हयांमध्ये काय महत्वाचे आहे व तपासा दरम्यान कश्या प्रकारे काळजी घ्यावी या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेला प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा श्री. के.एच. धात्रक, उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली श्री. संखे, उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी श्री. सांगळे, पोनि. श्री. गाडे जिवीशा भंडारा तसेच पो.स्टे. भंडारा, अडयाळ, लाखनी, गोबरवाही, पवनी, लाखांदुर, दिघोरी, सिहोरा, तुमसर, मोहाडी, जवाहरनगर, वरठी, करडी, कारधा, साकोली, पालांदुर, आंधळगाव या पोलीस स्टेशनचे व शाखेचे पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यशाळेचे संचलन सफौ. श्री. लांजेवार यांनी केले व आभार प्रदर्शन पोनि. श्री. चकाटे यांनी केले.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.